महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : २०७ वा दिनांक : १०/०६/२०२५ वार : मंगळवार

# १५ वे विद्रोही साहित्य संस्कृती संमेलन सातारमध्ये होणार



**सातारा :** विद्रोही सांस्कृतिक चळवळ, महाराष्ट्र यांच्यावतीनं १५ वे विद्रोही साहित्य संस्कृती संमेलन सातारा येथे आयोजित करण्यात येणार आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे अध्यक्ष कॉ. धनाजी गुरव आणि सेक्रेटरी डॉ.जालिंदर घिगे यांनी ही माहिती दिली. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त साताऱ्यात संमेलन घेण्याचे ठरले. सातारा येथे यापूर्वी ४ थे विद्रोही साहित्य संस्कृती संमेलन २००२ मध्ये झाले होते. ज्येष्ठ विचारवंत डॉ. बाबा आढाव त्या साहित्य संस्कृती संमेलनाचे अध्यक्ष होते. आता २२ वर्षानंतर पुन्हा एकदा साताऱ्यात विद्रोही साहित्य संस्कृती संमेलन आयोजित करण्यात येणार आहे.

साताऱ्याच्या प्रतिसरकारचे संस्थापक क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त संमेलनाच्या माध्यमातून अभिवादन करण्यात येणार आहे. साताऱ्याचे प्रतिसरकार हे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, महिला यांना सोबत घेऊन जाणारे होते, त्यांच्या उत्कर्षाचं काम करणारं होते. त्यांनी केवळ घोषणा केल्या नाहीत तर गरिबातील गरिबांना न्याय देण्याच्या दृष्टीनं भूमिका घेऊन सातत्यानं कार्य केले. म्हणून आम्ही विद्रोही सांस्कृतिक चळवळ साताऱ्याच्या प्रतिसरकारला महत्त्व देतो आणि त्यासाठीच सातारला होणारे नियोजित १५ वे विद्रोही साहित्य संस्कृती संमेलन क्रांतिसिंह नाना पाटील व साताऱ्याच्या प्रतिसरकारला आम्ही समर्पित करत आहोत. या संमेलनात लोक साहित्य आणि साताऱ्याचे प्रतिसरकार, वारकरी आणि साताऱ्याचे प्रतिसरकार, साहित्यातील महिलांच्या प्रतिमा व विद्रोही साहित्य, स्वातंत्र्य चळवळ व संयुक्त महाराष्ट्र लढ्यात साहित्यिक, कलावंतांचे योगदान, आदिवासींचे सशस्त्र लढे व स्वातंत्र्य चळवळ, भारतीय संविधानाची 75 वर्षे या अनुषंगानं चर्चासत्र, परिसंवाद तसेच विद्रोही शाहिरी जलसा, कवी संमेलन आयोजित केले जाणार आहेत अशी माहिती प्रवक्ते अविनाश कदम यांनी दिली.

विद्रोही सांस्कृतिक चळवळ, महाराष्ट्राच्यावतीनं यापूर्वीचे १४ वे साहित्य संस्कृती संमेलन पुणे येथे १० व ११ डिसेंबर २०२२ रोजी पार पडले होते. त्या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. भारत पाटणकर हे होते. पहिले विद्रोही मराठी साहित्य संमेलन धारावी (मुंबई) येथे पार पडल्यानंतर कोल्हापूर, औरंगाबाद, सातारा, सावंतवाडी, पंढरपूर, धुळे, सोलापूर, इंदापूर, सांगली, राहुरी, बीड, शहादा, पुणे या ठिकाणी संमेलने झाली आहेत.

विद्रोही साहित्य संस्कृती संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ यशवंत मनोहर, प्रा डॉ. आ. ह. साळुंखे , डॉ बाबा आढाव, प्रा डॉ बाबुराव गुरव , कॉ. नजूबाई गावित, डॉ भारत पाटणकर, कवी वाहरु सोनावणे, रुपा बोधी यांचा या संमेलनात यथोचित सत्कार करण्यात येणार आहे.

क्रांतिसिंह नाना पाटील यांचे नातू अॅड. सुभाषबापू पाटील, व्ही. वाय आबा पाटील, प्रसेनजीत गायकवाड, शिवराम सुकी, कॉ अशोक जाधव, ह.भ.प. डॉ. सुहास फडतरे, डॉ. बापू चंदनशिवे, प्रा. दिनकर दळवी, प्रा. सुधीर अनवले, ज्योती आदाटे , अॅडव्होकेट सरफराज बागवान, अॅडव्होकेट राजेंद्र गलांडे, प्रा. सीमा मुसळे, शिवराम ठवरे आदी हे संमेलन यशस्वी होण्यासाठी सक्रीय झाले आहेत.

# राज ठाकरे महाविकास आघाडीसोबत जाणार? जयंत पाटलांचे मोठे विधान



**पुणे :** महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात कमालीचे बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एकीकडे ठाकरे बंधू एकत्र येणार म्हटले जात आहे, तर दुसरीकडे पवार काका पुतणे एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. जे जनतेच्या मनात, तेच होईल. आता थेट बातमीच देऊ, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी सूचक विधान केले आहे. यावर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी मोठे विधान केले आहे.

माध्यमांशी बोलताना जयंत पाटील यांनी म्हटले की, ठाकरे यांना एकत्रित आणण्याचे काम माध्यमे करत आहेत. राज ठाकरे प्रभावी वक्ते आहेत. जर आघाडीची ताकद वाढत असेल, तर त्यांना सामील करण्यात काहीच गैर नाही, असे विधान जयंत पाटील यांनी केले आहे.

जयंत पाटलांच्या या विधानामुळे आता प्रश्न उपस्थित झाला आहे की, राज ठाकरे शिवसेना ठाकरे गटासोबत युती करणार की महाविकास आघाडीसोबत जाणार? कारण उद्धव ठाकरेंची शिवसेना ही महाविकास आघाडीतील घटक पक्ष आहे, त्यात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांची युती व्हावी अशी इच्छा अनेक शिवसैनिक तसेच मनसैनिक व्यक्त करत आहेत. परंतु ही युती केवळ दोघांची असणार का? दोघांचीच असल्यास शिवसेनेला महाविकास आघाडीमधून बाहेर पडावे लागेल, अन्यथा राज ठाकरे यांनाच महाविकास आघाडीत जावे लागणार. दोन्ही ठाकरे बंधू काय निर्णय घेतात याकडे आता सर्वांचेच विशेष लक्ष असणार आहे.

जयंत पाटील यांनी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चांवर देखील प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, अशा कोणत्याही चर्चा पक्षात सुरू नाहीत. केवळ प्रसारमाध्यमांमधून ही चर्चा पसरवली जात आहे, असे पाटलांनी म्हटले आहे. दरम्यान, उद्या राष्ट्रवादी काँग्रेसचा वर्धापनदिन आहे, याविषयी विचारले असता जयंत पाटील म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा उद्या पुण्यात वर्धापनदिन सोहळा पार पडणार आहे. गेल्यावर्षी नगरमध्ये जेव्हा कार्यक्रम झाला, त्यावेळी पावसामुळे फार मोठ्या प्रमाणात हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. यंदा हवामान खात्याचा अंदाज पावसाचा नसला तरी कोणताही रिस्क नको म्हणून पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर या सभागृहात कार्यक्रम होणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

# सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणी सुनावणी पूर्ण : प्रकाश आंबेडकरांचा न्यायालयात युक्तिवाद



**छत्रपती संभाजीनगर :** परभणी येथील संविधान शिल्प विटंबना प्रकरणी आंदोलन करणाऱ्या शहिद सोमनाथ सूर्यवंशी यांचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाल्या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात विजयाबाई सूर्यवंशी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी पार पडली.

सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी झालेल्या सुनावणीत, न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाल्यानंतर मॅजिस्ट्रेट चौकशीनंतर पुढील कायदेशीर कारवाईबाबत कायद्यात अपूर्णता असल्याचे अधोरेखित करण्यात आले. याबाबत कायद्यातील तरतूद पूर्ण करावी, अशी मागणी अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.

यावर आंबेडकर म्हणाले, कायद्यातील तरतुदी पूर्ण करावी ही आमची ठाम मागणी होती, जी न्यायालयाने समजून घेतली असून याबाबत “कायदा असला पाहिजे” असे स्पष्ट मत मांडले आहे.

तसेच या प्रकरणात विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्याची आंबेडकर यांनी दुसरी महत्त्वपूर्ण मागणी केली आहे. सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू न्यायालयीन कोठडीत झाल्याने पोलिसांकडून चौकशी न होता स्वतंत्र SIT द्वारे तपास व्हावा, ही आमची भूमिका न्यायालयाने ऐकून घेतली आहे. लवकरच यासंदर्भातील आदेश अपेक्षित असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या प्रकरणात सुनावणी पूर्ण झाली आहे. या संदर्भात दोन स्वतंत्र आदेश येण्याची अपेक्षा आहे. कायद्यातील त्रुटी दूर करण्यासंदर्भातील तसेच SIT नेमणुकीसंदर्भातील या संदर्भात न्यायालय काय भूमिका घेणार याकडे आता लक्ष असेल. तसेच या प्रकरणाचा जो निर्णय येईल तो निर्णय देशभरातील न्यायालयीन कोठडीत होणाऱ्या मृत्यू प्रकरणांसाठी दिशादर्शक ठरेल, असा विश्वास आंबेडकर यांनी व्यक्त केला आहे.

परभणी हिंसाचार प्रकरणात पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या सोमनाथ सूर्यवंशीचा १६ डिसेंबर २०२४ रोजी न्यायालयीन कोठडीत असताना मृत्यू झाला होता. सुरुवातीला हा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे सांगण्यात आले होते. परंतु, त्याच्या शवविच्छेदन अहवालात मारहाणीमुळे मृत्यू झाल्याचे समोर आले होते. तसेच सोमनाथचा मृत्यू मारहाणीत झाल्याचे न्यायदंडाधिकाऱ्यांच्या अहवालात म्हटले आहे. सोमनाथच्या मृत्यूला पोलिस जबाबदार असल्याचेही अहवालातून पुढे आले आहे. आता या प्रकरणाचा तपास सीआयडीकडून करण्यात येणार आहे. त्यामुळे या प्रकरणात आरोपींवर हत्येचा गुन्हा दाखल करण्याची शक्यता आहे. सोमनाथ सूर्यवंशींच्या कुटुंबीयांनी न्यायाची मागणी केली असून उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. यात कुटुंबीयांची बाजू वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर हे मांडत आहेत.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० जून २०२५

# पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समितीवर काँग्रेसचा झेंडा

**पांढरकवडा (महेश मुंढे)** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची निवडणूक होऊन आज या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आहे. काँग्रेस प्रणित आघाडीचे १८ पैकी १७ संचालक निवडून आले तर एक अपक्ष संचालक निवडून आला. आमदार तोडसाम-अण्णासाहेब गटाला शून्य (०) जागा मिळाल्याने काँग्रेस प्रणित आघाडीने कृषी उत्पन्न बाजार समितीवर आपल्या विजयाचा झेंडा रोवला आहे.या निवडणुकीत सहकारी संस्था सर्वसाधारण मतदारसंघातून बोडेवार श्रीकांत प्रशांत, निमनवार राकेश राघोलू, भोयर हरिभाऊ यादवराव, धोपे प्रेमजीत लक्ष्मीनारायण, रिंगणवार हरिहर नागोराव, राठोड लक्ष्मण हरिभाऊ इत्यादी विजयी झाले तर इतर मागास प्रवर्ग मतदारसंघातून डंभारे विनोद जनार्दन हे विजयी ठरले आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक मतदार संघातून चव्हाण विजय मानसिंग, तर ग्रामपंचायत सर्वसाधारण मतदारसंघातून गुंडेवार संतोष मधुकर ग्राम वांजरी आणि ठाकरे विलास नानाजी ग्राम पाहापळ विजयी ठरले अनुसूचित जमाती मतदारसंघातून कनाके हिरामण काशीराम, तर महिला राखीव मतदार संघातून तालकोकुलवार कविता नवनीत, आणि येलटीवार सुगंधाबाई शिवारेड्डी निवडून आलेत हमाल मापारी मतदारसंघातून गेडेकर शुभम किशोर आणि व्यापारी अडते मतदारसंघातून बोरले रजनीकांत डालुराम, पांढरकवडा, शालमवार विवेक सुरेश मराठवाकडी, याशिवाय अनुसूचित जाती जमाती मतदारसंघातून परचाके उत्तम शालिकराव विजयी ठरले

# संदीप क्षीरसागर यांच्या विरोधात गंभीर आरोप



**बीड :** विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्याविरोधात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर जोरदार आंदोलन छेडले आहे. आमदार क्षीरसागर यांनी महायुतीच्या कार्यकर्त्यांची विकासकामे हेतुपुरस्सरपणे रोखल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

सन २०१९ पासून आमदार क्षीरसागर कोट्यवधी रुपयांची टक्केवारी घेऊन कामांमध्ये अडथळा निर्माण करत असल्याचा थेट आरोपही स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला. ते केवळ तोडपाणी मिळवण्यासाठी कामे थांबवत असून, ही बाब उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार यांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी हे आंदोलन केले जात असल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले.

ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा आणि विकासकामांमध्ये जिल्हा परिषद आणि सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत होणाऱ्या कामांना अडथळा आणला जात असल्याचा आरोपही करण्यात आला. विशेष म्हणजे, हे आरोप केवळ आमदारांवरच नव्हे तर काही प्रशासकीय अधिकाऱ्यांवरही केले गेले आहेत.

आंदोलकांनी आरोप केला की, पीडब्ल्यूडीचे कार्यकारी अभियंता तोंडे, उपअभियंता बोराडे आणि कनिष्ठ अभियंता ठाकूर हे अधिकारी आमदार क्षीरसागर यांच्या प्रभावाखाली असून, त्यांना पालकमंत्री किंवा इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे फोन आले तरीही ते कोणतेही काम ऐकत नाहीत. हे अधिकारी आमदारांच्या घरगडीप्रमाणे वागत असल्याचा गंभीर आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

या आंदोलनात महायुतीतील तिन्ही पक्षांचे स्थानिक पदाधिकारी एकत्र येऊन विरोधी पक्षातील आमदाराविरोधात आवाज उठवत आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील राजकारणात या आंदोलनामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

दरम्यान, आगामी ३ ते ४ महिन्यांत राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता असून, त्याच्या पार्श्वभूमीवर स्थानिक राजकारण चांगलंच तापले आहे. सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील पदाधिकारी आक्रमक भूमिका घेताना दिसत आहेत. अनेक ठिकाणी नेते आणि कार्यकर्ते मतदारसंघ तसेच प्रभागांमध्ये सक्रीय होत असून, जनसंपर्क वाढवण्यावर भर दिला जात आहे.

या निवडणुकांना लक्षात घेता, गावपातळीवरील विकासकामांना गती देण्याचा प्रयत्न सुरू आहे. कामे मार्गी लावून मतदारांसमोर ठोस कामगिरी सादर करण्यासाठी राजकीय नेतेमंडळी हालचाली करताना दिसत आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात स्थानिक राजकारणात मोठे उलथापालथी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव, माजी मंत्री बसवराज पाटील यांच्या हस्ते पूजन, भव्यदिव्य मिरवणूकीने सांगता संपन्न



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त येथील जय मल्हार युवक मंडळाच्या वतीने रविवारी (दि.८) शहरातील प्रमुख मार्ग डॉ. आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महात्मा बसवेश्वर चौक, साठे चौक, अशोक चौक, टिळक चौक, किसान चौक, सुभाष चौक, गांधी चौक,हनुमान चौका पर्यंत अहिल्यादेवी यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची वाजत-गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली.प्रारंभी माजी राज्यमंत्री बसवराज पाटील यांच्या हस्ते राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. यावेळी सपोनि नवनाथ गाडेकर, सुधीर चव्हाण, श्रीकांत बेंडकाळे, जयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष बिरू ढंगापुरे, उपाध्यक्ष राम चेंडके आदीउपस्थित होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. पारंपारीक वाद्य ढोल वाजत - गाजत डीजेच्या तालावार नाचत मिरवणुकीची हनुमान चौकात सांगता करण्यात आली. मिरवणुकीत कर्नाटकातील मनाळी (ता. बसवकल्याण) येथून आलेल्या ढोल पथकाने पारंपरिक ढोल वाजवत मिरवणुकीची शोभा वाढवली. यशस्वितेसाठी विजय घोडके, श्रीकांत बन्ने, दिगंबर सोनटक्के, दत्ता घोडके, राहुल बन्ने, अक्षय बन्ने, गुरुनाथ घोडके, गंगाधर दूधभाते, विजय दूधभाते, बंडू बन्ने, महेश बन्ने, संतोष चेंडके, धोंडीबा बनसोडे,श्रीकांत बन्ने,अनिल जवान, अप्पू बन्ने,अपास बन्ने, आकाश गाडेकर, हनुमंत सोनटक्के, हिरगू सोनटक्के, श्याम करगले, दादा बन्ने, मारुती बन्ने, लक्ष्मण बन्ने, धोंडीबा दूधभाते, विश्वनाथ जवान, शरण घोडके, शिवा दूधभाते, राजू उजळंबे आदींनी पुढाकार घेतला. मिरवणुकीत महिला व समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले.

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact : 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० जून २०२५


# पीओपी गणेश मूर्तींवरील बंदी रद्दबातल



**मुंबई :** यंदाच्या गणेशोत्सवापूर्वी मूर्तिकार आणि गणेशोत्सव मंडळांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने प्लास्टर ऑफ पॅरिस (POP) गणेश मूर्ती तयार करण्यावरील आणि विक्री करण्यावरील बंदी उठवली आहे. या निर्णयामुळे मूर्तिकार आणि गणेशोत्सव मंडळांमध्ये समाधानाचं वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, या मूर्तींचे विसर्जन केवळ कृत्रिम तलावांमध्येच करण्याची सक्ती कायम राहणार असून, नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विसर्जनास सक्त मनाई करण्यात आली आहे.

न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान, मुख्य न्यायाधीश आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये कोणत्याही पीओपी मूर्तीचे विसर्जन करण्यास परवानगी दिली जाणार नाही. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) तज्ज्ञ समितीनेही हीच शिफारस केली होती, त्यानुसार पीओपी मूर्ती केवळ कृत्रिम जलसाठ्यातच विसर्जित करता येतील.

उच्च न्यायालयाने राज्य सरकारला पुढील तीन आठवड्यांत एक समिती नेमून पीओपी मूर्तींच्या विसर्जनासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जातील, यावर सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. या अहवालात विसर्जनासाठीच्या पायाभूत सुविधा आणि व्यवस्थापनाविषयीची माहिती असणे अपेक्षित आहे.

या निर्णयामुळे आता घरगुती आणि सार्वजनिक गणेशोत्सवासाठी पीओपी मूर्ती साकारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, पर्यावरणाची काळजी घेण्यासाठी कृत्रिम तलावांमध्येच विसर्जन करण्याच्या अटीचे पालन अनिवार्य राहील. यामुळे ज्या मूर्तिकारांनी आधीच पीओपी मूर्ती तयार करण्यास सुरुवात केली होती, त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

कोणत्याही परिस्थितीत नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये कोणत्याही पीओपी मूर्तीचे विसर्जन करण्यास परवानगी देणार नाही, असे मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. मुख्य न्यायाधीश आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने सांगितले की, ते कोणत्याही पीओपी मूर्तीचे नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये विसर्जन करण्यास परवानगी देणार नाही.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) तज्ज्ञ समितीने शिफारस केली आहे की, पीओपी मूर्ती तयार करता येतील. परंतु नैसर्गिक जलसाठ्यात विसर्जित करता येणार नाहीत. सीपीसीबी समितीने असे म्हटले आहे की, अशा मूर्ती फक्त कृत्रिम जलसाठ्यात विसर्जित केल्या जाऊ शकतात. पीओपी बनवलेल्या मूर्तींच्या विसर्जनाबाबत आता राज्य सरकारला विवेकबुद्धी वापरावी लागेल आणि निर्णय घ्यावा लागेल, असे खंडपीठाने म्हटले आहे.

सुनावणी दरम्यान मोठ्या मूर्तींच्या विसर्जनाबाबत एकमेव मुद्दा समोर आला. यावेळी न्या. मारणे यांनी मंडळांना दरवर्षी एक मूर्ती बनवून ती सुरू ठेवण्यास सांगितले जाऊ शकते का? असा सवाल उपस्थित केला. त्यावर राज्याचे महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ यांनी मोठ्या मूर्तींसाठी काही "सवलत" मागितली आहे. या मोठ्या मूर्ती (२० फूट आणि त्याहून अधिक उंचीच्या) आपल्या संस्कृतीचा भाग बनल्या आहेत, असे सराफ म्हणाले.

सीजे आराधे यांनी म्हटले की, आम्हाला खात्री आहे की, कोणत्याही पीओपी मूर्तीचे नैसर्गिक जलसाठ्यात विसर्जन करण्याची परवानगी दिली जाणार नाही. तुम्ही कृत्रिम जलसाठे तयार करू शकता आणि तेथे पीओपी मूर्तीचे विसर्जन करू शकता. एजी सराफ यांनी म्हटले की, जर मंडळांनी कायमस्वरूपी त्याच मूर्तीचा वापर केला तर राज्य म्हणून आम्ही त्यात अडथळा आणणार नाही. यावर सीजे आराधे यांनी हो, तुम्ही निर्णय घ्या, असे म्हटले आहे.

- तज्ज्ञ समितीने मान्य केले की, अशी मार्गदर्शक तत्वे नेहमीच सल्लागार स्वरूपाची असतात.
- तज्ज्ञ समितीने, सीपीसीबीने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची कायदेशीर स्थिती आणि महाराष्ट्र सरकारकडून ०९.०४.२०२५ आणि ०५.०५.२०२५ रोजीच्या पत्रांद्वारे प्राप्त झालेल्या राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाच्या प्रतिनिधित्वाची आणि समितीच्या अहवालाचा विचार केला आहे.
- तज्ञ समितीचे मत आहे की, राज्य सरकार खालील अटींच्या अधीन राहून पीओपीपासून बनवलेल्या मूर्तीचे विसर्जन करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेऊ शकतात.
- राज्य सरकारने पीओपी मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी तात्पुरते कृत्रिम तलाव असल्याची खात्री करावी. परंतु पीओपी मूर्तीचे विसर्जन नद्या, तलाव, नैसर्गिक तलाव आणि समुद्रात करण्यास परवानगी दिली जाणार नाही.
- विसर्जनानंतर, राज्य सरकार तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावांमध्ये जमा झालेले साहित्य काढून टाकण्याची खात्री करेल. गोळा केलेले पीओपी साहित्य पुनर्जन्म आणि पुनर्वापरासाठी उचलले जाईपर्यंत पर्यावरणपूरक पद्धतीने साठवले जाईल.
- पर्यावरणपूरक आणि शाश्वत पद्धतीने मूर्ती विसर्जन करण्यासाठी सीपीसीबीने २०२० मध्ये जारी केलेल्या सुधारित मार्गदर्शक तत्त्वांमध्ये दिलेल्या इतर उपाययोजनांचे पालन करणे.

## ६ हजार प्रवासी असल्याने लोकल एका बाजुला झुकते - प्रवासी संघटनेने मांडले वास्तव



**मुंबई :** रेल्वे प्रवासी संघटनेने मुंब्रा येथील रेल्वे ट्रॅकच्या धोकादायक वळणाचे वास्तव मांडले आहे. येथील वळणावर रेल्वे एका बाजुला झुकते, तब्बल ६००० प्रवासी रेल्वेतून प्रवास करत असल्याने ट्रेन ओव्हरलोड होऊन एका बाजुला झुकते, असे रेल्वे प्रवासी संघटनेच्या सिद्धेश देसाई यांनी सांगितले आहे.

रेल्वे प्रवासी संघटनेचे उपाध्यक्ष सिद्धेश देसाई म्हणाले, मुंब्राच्या वळणाबद्दल आधी सुद्धा आम्ही रेल्वे प्रशासनाला पत्रव्यवहार केला होता. कारण, येथील वळणावर रेल्वे एका बाजूला झुकते, एका लोकलमध्ये ३६०० प्रवासी प्रवास करतात. मात्र, पिक अवरमध्ये एका लोकलमधील संख्या ६००० पेक्षा जास्त होते. जेव्हा ही संख्या जास्त होते तेव्हा लोकलमध्ये लोड येऊन ती एका बाजूला झुकते. एका वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली आहे.

पुढे बोलताना सिद्धेश देसाई म्हणाले, आम्ही दिवा ते ठाण्यादरम्यान रेल्वे संख्या वाढवा हे वारंवार सांगतोय, पंतप्रधानांनी सुद्धा ही मागणी मान्य केली होती. मात्र, त्यावर कुठल्याही प्रकारे रेल्वे प्रशासनाने काम केले नाही. जे वळण निर्माण झाले आहे, त्यावर इंजिनियर सुद्धा काही करू शकत नाहीत, असे त्यांनी म्हटले आहे.

मुंब्रा येथे झालेल्या लोकल ट्रेन दुर्घटनेनंतर प्रवासी संघटनांनी मध्य रेल्वे प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. गेल्या वर्षभरापासून प्रवासी संघटनांना भेटण्याची वेळ दिली जात नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. प्रवासी संघटनेचे प्रतिनिधी नंदकुमार देशमुख यांनी आरोप केला आहे की, रेल्वे प्रशासन रेल्वे आणि ट्रॅकच्या देखभालीवर खर्च करण्याऐवजी अमृत योजनेअंतर्गत स्थानकांवर अधिक खर्च करत आहे. या संदर्भात, प्रवासी संघटनांनी मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांकडून भेटीची वेळ मागितली आहे. जर भेट नाकारली गेली, तर मोठ्या आंदोलनाचा इशाराही संघटनेने दिला आहे.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १० जून २०२५

# नितेश राणेंना सल्ला देणारे ट्विट डिलीट



**सिंधुदुर्ग :** धाराशिव जिल्हा नियोजन समितीच्या निधी वाटपावरून भाजप आणि शिवसेना ठाकरे गटात वाद उफाळून आला आहे. भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केलेल्या तक्रारीनंतर समितीच्या कामांवर तात्पुरती स्थगिती घालण्यात आली. याच पार्श्वभूमीवर धाराशिव येथे आयोजित भाजपच्या मेळाव्यात मंत्री नितेश राणे यांनी जोरदार भाष्य करत म्हटले की, "कोणी कितीही ताकद दाखवली, कोणी कसेही नाचले, तरी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीच राहतील आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच असतील. मुख्यमंत्रिपदावर बसलेला नेता भाजपचाच आहे, हे लक्षात ठेवा."

या वक्तव्यानंतर नितेश राणे यांचे बंधू व शिवसेनेचे कुडाळचे आमदार नीलेश राणे यांनी सोशल मीडियावर एक सूचक पोस्ट करून त्यांना सल्ला दिला. नितेश राणे यांनीही त्या पोस्टला प्रत्युत्तर दिले. काही वेळातच नीलेश राणे यांनी ती पोस्ट हटवली. त्यानंतर आता त्यांनी स्वतःच ती पोस्ट मागे घेण्यामागचे कारण स्पष्ट केले आहे.

पोस्ट डिलीट केल्यावर नीलेश राणे यांनी स्पष्टीकरण देताना म्हटले की, नितेश राणे यांच्याबाबत केलेले ते ट्विट मी अधिकार वाणीने केलेले होते. नितेश हा माझा लहान भाऊ आहे आणि त्याने मला वडिलांप्रमाणेच माण दिलेला आहे. त्याला हक्काने बोलणे हा नितेशने मला दिलेला अधिकार आहे आणि त्या सहजतेने मी त्याला बोललो. मी ट्विट डिलीट केले, मला जो त्यातून मेसेज द्यायचा होता तो मी दिला. मी यापूर्वी सुद्धा अनेक ट्विट डिलीट केले आहेत. त्यामुळे ट्विट डिलीट केले त्यातून वेगळा अर्थ काढू नका. उबाठाला यातून फायदा घेण्यासारखे काही नाही. एका भावाने दुसऱ्या भावाला दिलेला तो सल्ला होता, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# मोदींचा कारभार म्हणजे 'बोलाचा भात, बोलाचीच कढी' - हर्षवर्धन सपकाळ



**नागपूर :** मोदी सरकारचा कारभार म्हणजे "बोलाचीच कढी बोलाचाच भात' अशी स्थिती आहे, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी येथे माध्यमांशी बोलताना केली. हॅपी इंडेक्स, बेरोजगार, गरीब गरीब का झाला, २०१४ मध्ये २ कोटी नोकऱ्या देऊ, शेतकरी उत्पन्न दुप्पट करू, स्वामीनाथन आयोग, स्मार्ट सिटी, या पलीकडे जाऊन प्रत्येक माणसाच्या खिशात १५ लाख देणार याचा लेखाजोखा दिला पाहिजे असे सपकाळ म्हणाले.

अण्णा हजारे, बाबा रामदेव यांनी पेट्रोल दर, लोकपाल यांचे काय झाले याचे उत्तर दिले पाहिजे. आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिकेने अहवाल दिला, त्यात हेट स्पीच म्हणून मोदींच नाव आहे. ऑपरेशन सिंदूर नंतरचा लेखा जोखा, अदानी अंबानी यांची संपत्ती किती वाढली हेही सांगायला पाहिजे असे ते म्हणाले. राष्ट्रवादी एकत्री करणाबाबत काय निर्णय घ्यायचा हा दोन्ही राष्ट्रवादीचा प्रश्न आहे. येतील त्यांना सोबत घेऊन जाऊ. ठाकरे बंधुंच्या एकत्र येण्याबद्दल तेच चांगल्या पद्धतीने सांगतील. महाराष्ट्रात अनेक समस्या आहे.

शेतकरी मुद्दे आहे, पीक कर्ज, पीक कर्ज माफी, संदर्भात कुठलाही निर्णय झालेला नाही. बी बियाण्यांचा तुटवडा निर्माण झाला आहे. शेतकऱ्याला हेक्टरी ५० हजार रुपये दिले गेले पाहिजे. या प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्यासाठी हे सगळे सुरू आहे, असा पलटवार सपकाळ यांनी केला.आम्ही निर्णय घेतलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्थानिक पातळीवर आमचे नेते आणि संघटितपणे निर्णय घेतील, ते आम्ही कळवले सुद्धा आहे. किरण कुलकर्णीची नार्को टेस्ट करायला हवी. मतांवर डल्ला मारला त्याचे सूत्रधार हे कुलकर्णी आहे.

संध्याकाळी सहा नंतर ७४ लाख मतदान कसे वाढले, हे ओपन सिक्रेट आहे.निवडणूक आयोगाकडे लेखी तक्रार अगोदर सुद्धा केलेली आहे. निवडणूक आयोग अमित शहा यांच्या सूचनेनुसार काम करीत असल्याचे स्पष्ट होत आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री होण्या पूर्वी काँग्रेसचे शिष्ट मंडळ पुराव्यांशी निवडणूक आयोगात गेले होते. पाच वाजल्यानंतर मतदान ८.७४�कसे वाढले हे सांगा. बच्चू कडू त्यांच्या मागणीवर किती दिवस कायम राहतात हे पाहू. या नंतरच काँग्रेस निर्णय घेईल

# तारेच्या कुंपणात अडकून बिबट्या ठार



**भंडारा :** भंडारा वन विभागांतर्गत येणाऱ्या अड्याळ वनक्षेत्रातील सहवनक्षेत्र माडगी( पूर्व), नियतक्षेत्र पुरकाबोडी १ येथील मलकाझरी येथे शेतीमधील पिकांचे संरक्षण करण्यासाठी लावण्यात आलेल्या तारेच्या कुंपणाला अडकून बिबट मृत अवस्थेत आढळून आल्याची घटना रविवारी सकाळी उघडकीस आली.

घटनेची माहिती प्राप्त होताच वनाधिकारी व वन कर्मचारी पथकासह तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर त्यांनी पंचनामा केला.

ही कार्यवाही राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणचे प्रमाणभूत कार्यपद्धतीनुसार करण्यात आली व तद्नंतर मृत बिबट्याचे दहन करण्यात आले. मृत बिबट्याच्या अवयवांचे नमुने घेण्यात आले असून ते उत्तरीय तपासणीकरिता प्रयोगशाळेत पाठवण्यात येणार आहेत. या प्रकरणी वन अपराधाची नोंद करण्यात आली असून पुढील तपास उपवन संरक्षक भंडारा राहूल गवई यांचे मार्गदर्शनात सचिन निलख सहायक वनसंरक्षक करणार आहेत.

